# प्रकरण चौथे

# संशोधनाचे नियोजन व कार्य पध्दती

प्रकरण चौथे

# संशोधनाचे नियोजन व कार्यपध्दती

४.१ प्रस्तावना

४.२ संशोधन पध्दतीचे स्वरुप

४.३ नमुना अभ्यास गट

४.४ संशोधनाची साधने

१) प्रश्नावली
२) मुलाखती
३) भेटी व निरीक्षण

४.५ संशोधनाची कार्यपध्दती

४.६ समारोप

संदर्भ ..........

प्रकरण चौथे

# संशोधनाचे नियोजन व कार्यपध्दती

## ४.१ प्रस्तावना :-

मागील प्रकरणामध्ये संशोधन विषयाशी संबंधित असलेल्या व त्या विषयात आतापर्यंत करण्यात आलेल्या संशोधनाचा मागोवा घेतलेला आहे. यावरुन असे दिसून आले की, शैक्षणिक प्रशासनाच्या क्षेत्रात झालेल्या संशोधनात प्राथमिक शिक्षणाचा कायदा, या कायद्यामुळे अस्तित्वात आलेल्या प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा तौलनिक अभ्यास, प्राथमिक शिक्षण राबविणा-या विविध संस्थांचे परस्पर संबंध यावर संशोधन झालेले नाही. या प्रकरणात संशोधन पध्दतीच स्वरुप व संशोधन करण्यासाठी नियोजन केलेल्या कार्यपध्दतीची माहिती दिलेली आहे.

"माढा तालुक्यातील प्राथमिक शाळांच्या प्रशासनाचा तौलनिक अभ्यास " या विषयावर संशोधन करण्याचे संशोधकाने निश्चित केल्यानंतर प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेला माढा तालुका हा सोलापूर जिल्हयातील एक तालुका असून या तालुक्यास नैसर्गिक तसेच अध्यात्मिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणारा असा हा माढा तालुका आहे.

## ४.२ संशोधन पध्दतीचे स्वरुप :-

संशोधनाच्या अनेक पध्दती व साधने आहेत. ऐतिहासिक संशोधन पध्दती, सर्वेक्षण पध्दती, प्रायोगिक संशोधन पध्दती याशिवाय तुलनात्मक, कार्यकारण पध्दती सहसंबंध पध्दती, व्यक्ती अभ्यास पध्दती, वांशिक पध्दती व कृतीसंशोधन पध्दती इत्यादी पध्दती आहेत. या पध्दतीपैकी संशोधकाने प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी "सर्वेक्षण पध्दती " ची निवड केलेली आहे. सर्वेक्षण पध्दतीमध्ये वर्तमान परिस्थितीवर भर असतो. सदर पध्दतीत सर्वेक्षण करणे, पत्रके तयार करणे तसेच मापन, वर्गीकरण, अर्थनिर्वचन, मुद्यावर आधारित विषयाचे स्पष्टीकरण, तुलना व सार्थकता असते. सर्वेक्षण पध्दतीचे एकूण सहा प्रकार आहेत.

(१) विद्यालय सर्वेक्षण
(२) सर्वेक्षण परीक्षण
(३) प्रलेखी वारंवारिता अभ्यास
(४) सर्वेक्षण मूल्यांकन अभ्यास
(५) स्वरुपसाधने - पाठपुरावा अभ्यास
(६) आदर्श सर्वेक्षण (नमुनासर्वेक्षण)

संशोधनाच्या सर्वेक्षण पध्दतीच्या वरील प्रकारापैकी संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी "विद्यालय/शालेय सर्वेक्षण पध्दती" चा वापर केलेला आहे. शैक्षणिक प्रश्नांमध्ये शैक्षणिक संस्थांच्या गरजांचा शोध घेणे, त्या गरजा पूर्ण होण्यासाठी उपाययोजना ठरविणे, इत्यादींचा समावेश होतो. शैक्षणिक संस्थामध्ये शाळांची संख्या मोठी असल्यामुळे या पध्दतीस "शालेय सर्वेक्षण" असे नांव दिले आहे. शालेय संशोधनामध्ये शाळेची वास्तू, साहित्य, साधने, परिसर,

अभ्यासक्रम, पाठयपुस्तक, शाळेची अर्थव्यवस्था कशा प्रकारची आहे, असे अनेक विषय घेता येतात. हे सारे संशोधन शास्त्रीय पध्दतीनेच करावयाचे असते.

या संशोधनात शासन अनुदानित आणि विनाअनुदानित प्राथमिक शाळांच्या प्रशासनातील येणाऱ्या मुख्याध्यापकांचा व प्रशासकीय अधिकाऱ्यांचा विचार केला जाणार आहे. या संशोधनात पुढील अभ्यास घटकांचा समावेश करण्यात आला.

(१) अनुदानित आणि विनाअनुदानित प्राथमिक शाळेतील प्रशासनाचे सर्वेक्षण

(२) प्राथमिक शाळांच्या प्रशासनात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास.

(३) प्राथमिक शाळांच्या प्रशासनात येणाऱ्या समस्यानुसार उपाय सुचविणे.

हा अभ्यास सद्य:स्थितीशी संबंधित असल्यानेच संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचाच उपयोग केलेला आहे. प्रस्तुत संशोधनात प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाच्या समस्यांचा तौलनिक अभ्यास करावयाचा असल्याने संशोधकाने माढा तालुका पंचायत समितीच्या शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी, कुर्डुवाडी नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशसन अधिकारी, प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व प्रत्येक शाळा परिसरातील पालक यांची निवड केली. त्यांच्यासाठी प्रश्नावली आणि मुलाखती या संशोधन साधनांचा वापर केला. प्रश्नावली व मुलाखतीसाठी प्रश्नसूची तयार केली. या प्रश्नावलीच्या व मुलाखत प्रश्नसूचीच्या आधारेच संशोधकाने संशोधन कार्य पार पाडले व प्रस्तूत अहवाल तयार केला. वरील प्रमाणे संशोधन पध्दती संशोधन अभ्यासासाठी निश्चित केल्यानंतर, संशोधकाने आपली संशोधन कार्यपध्दती ठरविली.

## ४.३ नमुना अभ्यासगट :-

या संशोधनासाठी सोलापर जिल्हा परिषदेने माढा तालुका पंचायत समिती अंतर्गत चालविलेल्या माढा तालुक्यातील १० प्राथमिक शाळांची निवड केली. कुर्डुवाडी नरगपालिकेने कुर्डुवाडी परिसरात चालविलेल्या १० प्राथमिक शाळांची निवड केली, आणि ५ खाजगी स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या प्राथमिक शाळांची संशोधन अभ्यासासाठी निवड केली. या शाळांच्या नावांची यादी परिशिष्ट क्रमांक १ मध्ये दिली आहे.

## ४.४ संशोधनाची साधने :-

संशोधकाला संशोधन कार्यासाठी माहिती संकलित करण्यासाठी निरनिराळया साधनांची आवश्यकता जाणवली. संशोधकाने अभ्यासासाठी निश्चित केलेली उद्दिष्टे ही प्राथमिक शाळांच्या प्रशासनाशीच संबधित आहेत. संशोधकाने ज्या संशोधन साधनांचा वापर केला, त्यांचे विवेचन व कार्यपध्दती खालील प्रमाणे आहे.

१) <u>प्रश्नावली -</u>

अभ्यास पध्दतीचे स्वरुप, उद्दिष्टे व गोळा करावयाची माहिती या अनुषंगाने संशोधकास असे आढळून आले की, या अभ्यासासाठी प्रश्नावली हे साधन उपयुक्त आहे. संशोधकाने आपल्या मार्गदर्शकांशी चर्चा करुन प्रथम प्रश्नावली कच्च्या स्वरुपात तयार केल्या प्रश्नावलींची सहप्रमाणता व विश्वसंनियता प्राप्त करण्यासाठी संशोधकाने मार्गदर्शन व संशोधन क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून व चर्चा करुन प्रश्नावलीमध्ये सुधारणात्मक मुद्दे सुचविण्याची विनंती केली. त्यांच्या सूचनांप्रमाणे प्रश्नावलीमध्ये सुधारणा केली. सशोधकांनी मुख्याध्यापक, शिक्षक व पालक यांच्यासाठी स्वतंत्र अशा प्रश्नावली तयार केल्या प्रश्नावलीचे स्वरुप उद्दीष्टांनुसार आहे का ते तपासले. उद्दिष्टांनुसार माहिती मिळू शकेल याची खात्री झाल्यानंतर मार्गदर्शक डॉ. एम.ए. गायकवाड यांच्या मार्गदर्शनानुसार प्रश्नावलीमध्ये आवश्यक त्या ठिकाणी बदल करुन प्रश्नावली टंकलिखीत केल्या. नंतर माढा तालुक्यातील जिल्हापरिषदेच्या १० प्राथमिक शाळा, कुर्डुवाडी नगरपालिकेच्या १० प्राथमिक शाळा आणि खाजगी स्वयस्वेयी संस्थांच्या ५ विनाअनुदानीत प्राथमिक शाळा अशा एकूण २५ शाळांच्या मुख्याध्यापकांना, प्रत्येक शाळेच्या दोन शिक्षकांना आणि प्रत्येक शाळेच्या परिसरातील त्या शाळेत आपला पाल्य शिकत असलेल्या एका पालकासाठी प्रश्नावली पाठविण्यात आल्या. प्रत्यक्ष भेटी, सहकार्यामार्फत तसेच स्मरणपत्रे पाठवून सर्व प्रतिसादकांकडून प्रश्नावली भरुन घेतल्या. या प्रश्नावलीमध्ये मुख्याध्यापकांना, शिक्षकांना व पालकांना कोणत्या उद्दिष्टानुसार प्रश्न विचारले ते स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे. प्रश्नावलीतील विभाग, उद्दिष्टे व प्रश्नप्रकार हे खालीलप्रमाणे अनुक्रमे सारणी क्रमांक ४.१, ४.२, ४.३ मध्ये दर्शविलेले आहेत. हया प्रश्नावली अनुक्रमे परिशिष्ट क्रमांक २,४ व ६ मध्ये दिलेल्या आहेत. प्रतिसादक मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांच्या नावांची यादी अनुक्रमे परिशिष्ठ क्रमांक ३, ५ व ७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्रमांक ४.१

मुख्याध्यापकांसाठी असलेल्या प्रश्नावलीचे वर्गीकरण

| अ. क्र. | विभाग | उद्दिष्टे | प्रश्न क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | मुख्याध्यापकांची वैयक्तिक माहिती. | मुख्याध्यापकांची वैयक्तिक माहिती मिळविणे. | १ ते ४ |
| २ | प्राथमिक शाळांविषयी माहिती. | प्राथमिक शाळेविषयी सर्वसाधारण अशी माहिती मिळविणे. | ५ ते ८ |
| ३ | प्राथमिक शाळांमधील मनुष्यबळ विषयक माहिती. | प्राथमिक शाळेतील शिक्षक संख्या, शिक्षक नेमणुका आणि त्या संबंधित प्रशासकीय माहिती मिळविणे. | ९ ते २२ |
| ४ | अभ्यासक्रम, अध्यापन व अभ्यासेतर उपक्रमांच्या राबवणुकी विषयी माहिती. | प्राथमिक शाळेतील अभ्यासक्रम, अध्यापन व अभ्यासेतर उपक्रमांच्या राबवणुकी विषयी माहिती मिळविणे. | २३ ते २८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | प्राथमिक शाळेतील अर्थव्यवस्थे विषयी माहिती. | प्राथमिक शाळेतील आर्थिक नियोजन व आर्थिक तरतुदी विषयी माहिती मिळविणे. | २९ ते ३७ |
| ६ | शाळा इमारत व भौतिक सुविधा विषयी माहिती. | प्राथमिक शाळा इमारत भौतिक सुविधा शालेय परिसर यांची माहिती व नोंद घेणे. | ३८ ते ५० |
| ७ | प्रशासनाच्या राबवणुकी विषयी माहिती. | प्राथमिक शाळांच्या प्रशासनाच्या राबवणुकी विषयी माहिती मिळविणे. | ५१ ते ६७ |
| ८ | प्रशासन मंडळ विषयक माहिती | प्राथमिक शाळांचे प्रशासन अधिकार कोणास आहेत या विषयी माहिती मिळविणे | ६८ ते ६९ |
| ९ | शाळांच्या सामाजिक दर्जा विषयी माहिती. | प्राथमिक शाळांच्या सामाजिक दर्जा विषयी माहिती मिळविणे. | ७० ते ७४ |
| १० | तक्रारी, भांडणतंटे व न्यायविषयक तरतुदी विषयी माहिती. | मुख्याध्यापक-शिक्षक, शिक्षक-शिक्षक यांच्यातील संभाव्य भांडण तंटे व न्यायविषयक तरतुदींची माहिती मिळविणे. | ७५ ते ७६ |
| ११ | प्रशासनातील समन्वय व सुधारणा विषयी माहिती. | शाळांच्या प्रशासनातील समन्वय व सुधारणा विषयी माहिती मिळविणे. | ७७ ते ८० |

प्राथमिक शाळांच्या प्रशासनासंदर्भात माहिती हवी होती म्हणून मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली तयार केली. त्या प्रश्नावलीत एकूण ११ विभाग होते. त्यात एकूण ८० प्रश्न विचारण्यात आले त्यातील प्रश्न हे बध्द स्वरुपाचे व मुक्त स्वरुपाचे होते. ही प्रश्नावली परिशिष्ठ क्रमांक २ मध्ये दिलेली आहे. व प्रतिसादक मुख्याध्यापकांच्या नावांची यादी परिशिष्ठ क्रमांक ३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्रमांक ४.२

शिक्षकांसाठी असलेल्या प्रश्नावलीचे वर्गीकरण

| अ.क्र. | विभाग | उद्दिष्टे | प्रश्न क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | शिक्षकांची वैयक्तिक माहिती | शिक्षकांची वैयक्तिक माहिती मिळविणे. | १ ते १३ |
| २ | शिक्षकांच्या अध्यापना विषयी माहिती. | शिक्षकांच्या अध्यापनाच्या कार्यवाही विषयक माहिती मिळविणे. | १४ ते २२ |
| ३ | आर्थिक बाबींविषयी माहिती. | शिक्षकांचे वेतन, भविष्यनिर्वाह निधी इ. बद्दलची माहिती मिळविणे. | २३ ते २७ |
| ४ | प्रशासना विषयी माहिती. | शिक्षकांच्या शाळेतील शालेय प्रशासनासंबंधी सामान्य माहिती मिळविणे. | २८ ते ३८ |

संशोधन विषयासाठी नमूना म्हणून निवडलेल्या २५ प्राथमिक शाळांच्या प्रत्येक शाळेतील दोन या प्रमाणे एकूण ५० शिक्षकांकडून प्रश्नावली भरुन घेतल्या. व प्रतिसादाक शिक्षकांच्या नावांची यादी परिशिष्ट क्रमांक ५ मध्ये दिलेली आहे. ही प्रश्नावली परिशिष्ट क्रमांक ४ मध्ये दिलेली आहे. या प्रश्नावलीत एकूण ४ विभाग होते. त्यात एकूण ३८ प्रश्न होते. प्रश्नांचे स्वरुप बध्द आणि मुक्त अशा दोन्ही प्रकारचे होते.

## सारणी क्रमांक ४.३

### पालकांसाठी असलेल्या प्रश्नावलीचे वर्गीकरण

| अ.क्र. | विभाग | उद्‌दिष्टे | प्रश्न क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | पालकांची वैयक्तिक माहिती | पालकांची वैयक्तिक माहिती मिळविणे | १ ते ६ |
| २ | पाल्याची माहिती | पाल्याची व तो शिकत असलेल्या शाळेची माहिती मिळविणे | ७ ते ११ |
| ३ | पाल्य शिकत असलेल्या शाळेविषयी पालकांचे मत | पाल्य शिकत असलेल्या शाळेविषयी पालकाचे मत जाणून घेणे | १२ ते १७ |

संशोधनासाठी नमुना म्हणून निवडलेल्या २५ शाळांच्या प्रत्येकी एका पाल्याच्या पालकाकडून प्रश्नावली भरुन घेतल्या. अशा एकूण २५ पालकांकडून प्रश्नावली भरुन घेतल्या. त्यात एकूण ३ विभाग होते. त्यात एकूण १७ प्रश्न विचारले होते. त्यातील प्रश्न हे बध्द तसेच मुक्त स्वरुपाचे होते. ही प्रश्नावली परिशिष्ट क्रमांक ६ मध्ये दिलेली आहे. व प्रतिसादक पालकांच्या नावांची यादी परिशिष्ट क्रमांक ७ मध्ये दिलेली आहे.

माढा तालुक्यातील नमुना म्हणून निवडलेल्या २५ प्राथमिक शाळांपैकी २० शाळांमध्ये संशोधकाने समक्ष भेट देऊन प्रश्नावली दिल्या. तर ५ शाळांना प्रश्नावली संशोधकाने आपल्या सहकाऱ्यांच्या मार्फत पाठविलेल्या होत्या. एकूण २५ प्राथमिक शाळांपैकी १५ मुख्याध्यापकांनी लगेच तत्परतेने प्रश्नावली भरुन दिल्या. दुसऱ्या भेटीत ५ मुख्याध्यापकांनी प्रश्नावली भरुन दिल्या. परंतू ५ शाळांच्या मुख्याध्यापकांनी मात्र प्रश्नावली भरुन देण्यासाठी फारच उदासिनता दर्शविली. प्रश्नावली भरुन घेण्यासाठी त्यांना वारंवार भेटावे लागले. प्रश्नावली भरुन देणे हे एक निरर्थक काम आहे. अशीच त्यांची भावना होती. प्रत्येक शाळेतील दोन शिक्षक या प्रमाणे एकूण २५ शाळांतील ५० शिक्षकांकडून प्रश्नावली भरुन घेतल्या. त्यापैकी ४० शिक्षकांना प्रत्यक्ष भेटून प्रश्नावली दिल्या व भरुन घेतल्या. तर १० शिक्षकांना संशोधकाने आपल्या शाळेतील सहशिक्षकांमार्फत प्रश्नावली पाठविल्या. त्या लगेच भरुन मिळाल्या नमुन्यातील २५ शाळांमध्ये शिकत असलेल्या प्रत्येकी एका विद्यार्थ्यांच्या पालकांना समक्ष भेटून अशा २५ पालकांकडून प्रश्नावली भरुन घेतल्या. प्रश्नावली भरुन दिलेल्या मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांच्या नावांची यादी अनुक्रमे परिशिष्ट क्रमांक ३, ५ व ७ मध्ये दिलेली आहे. पुढील सारणी क्रमांक ४.४ मध्ये प्रतिसादकांना पाठविलेल्या प्रश्नावलीचे वर्गीकरण दिलेले आहे.

### सारणी क्रमांक ४.४

### प्रतिसादकांना पाठविलेल्या प्रश्नावलींचे वर्गीकरण

| प्रतिसादक प्रकार | प्रश्नावली पाठविलेल्या प्रतिसादकांची संख्या | पैकी समक्ष दिल्या | शाळेतील सहशिक्षकां मार्फत दिल्या |
|---|---|---|---|
| मुख्याध्यापक | २५ | २० | ०५ |
| शिक्षक | ५० | ४० | १० |
| पालक | २५ | २५ | ०० |

## २. मुलाखती :-

प्रश्नावलीमध्ये समाविष्ट न झालेल्या बाबींविषयी माहिती मिळविण्यासाठी आणि प्रश्नावलीतील प्रश्नांनी दिलेल्या उत्तरांची सत्यासत्यता पडताळणीसाठी मुलाखत घेणे आवश्यक असते. प्रश्नावलीत लेखी उत्तरे नोंदविणे असल्यामुळे सत्य माहिती लेखी स्वरुपात देण्याबद्दल प्रतिसादक पुरेसे धाडस दाखवित नाहीत किंवा प्रतिसादकांकडुन टाळाटाळ होऊ शकत असल्याने, पण अशी माहिती मुलाखतीव्दारे मिळू शकत असल्याने मुलाखत घेणे अपरिहार्य ठरते. तसेच प्रश्नावलीतील प्रश्नांचा अर्थ निट न कळल्याने प्रतिसाद चुकीचा अथवा पूर्ण स्वरुपात न दिला जाण्याचीही शक्यता गृहित धरावी लागते. या विविध उद्देशामुळे संशोधकाने परिपूर्ण माहिती संकलनासाठी मुलाखत या साधनाचा वापर केला.

### (अ) मुख्याध्यापकांच्या मुलाखती

संशोधन नमुन्यातील जिल्हा परिषदेच्या १० शाळांपैकी २ शाळाचे मुख्याध्यापक, कुर्डुवाडी नगरपालिकेच्या १० शाळांपैकी २ शाळांचे मुख्याध्यापक आणि खजगी स्वयंसेवी संस्थांच्या ५ शाळांपैकी दोन शाळांचे मुख्याध्यापक यांची मुलाखतीसाठी "सहेतुक नमना निवड" पध्दतीने निवड केली. ती निवड पुढील सारणी क्रमांक ४.५ मध्ये दिली आहे. मुख्याध्यापकांसाठी असलेली मुलाखत सूची परिशिष्ट क्रमांक ८ मध्ये दिलेली आहे. व मुलाखत घेतलेल्या मुख्याध्यापकांच्या नावांची परिशिष्ट क्रमांक ९ मध्ये दिली आहे.

### सारणी क्रमांक ४.५

### मुलाखतीसाठी मुख्याध्यापकांच्या निवडीचे वर्गीकरण

| अ.क्र. | शाळेचा प्रकार | एकुण मुख्याध्यापक |
|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद शाळा | २ |
| २ | नगरपालिका शाळा | २ |
| ३ | खाजगी विनाअनुदानित शाळा | ४ |
| | एकूण | ६ |

यaप्रमाणे ६ मुख्याध्यापकांच्या मुलाखती घेतल्या. त्यांच्या नावांची यादी परिशिष्ट क्रमांक ९ मध्ये दिली आहे. मुख्याध्यापकांसाठी असलेल्या मुलाखतीसाठी सहा विभाग केले होते आणि या सहा विभागात एकूण १७ प्रश्न विचारले होते. मुख्याध्यापकांसाठी असलेल्या मुलाखत सूचीचे वर्गीकरण खालील सारणी क्रमांक ४.६ मध्ये दिलेले आहे. ही मुलाखत सूची परिशिष्ट क्रमांक ८ मध्ये दिली आहे.

सारणी क्रमांक ४.६

मुख्याध्यापकांसाठी असलेल्या मुलाखत सूचीची रचना

| विभाग | प्रश्न क्रमांक | संबधित क्षेत्र |
|---|---|---|
| १ | — | मुख्याध्यापकांची वैयक्तिक माहिती. |
| २ | १ ते ४ | शिक्षण समिती विषयीची माहिती. |
| ३ | ५ ते ९ | मुख्याध्यापक पदाच्या अधिकाराची माहिती. |
| ४ | १० ते १३ | शाळा तपासणी विषयीची माहिती. |
| ५ | १४, १५ | शिक्षक तंटे व तक्रारी विषयीची माहिती. |
| ६ | १६,१७ | प्रशासनाच्या गुणवत्ते विषयीची माहिती. |

## ब) गट शिक्षणाधिकारी व प्रशासन अधिकारी यांच्या मुलाखती :-

माढा तालुका पंचायत समिती शिक्षण विभाग गट शिक्षणाधिकारी आणि कुर्डुवाडी नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी यांच्या मुलाखती संशोधकाने घेतल्या. मुलाखत घेण्यापुर्वी प्रस्तूत दोन्ही अधिका-यांना आठ दिवसापूर्वीच मुलाखत सूची दिली होती. मुलाखत सूचीचे वर्गीकरण सारणी क्रमांक ४.७ मध्ये दिले आहे.

सारणी क्रमांक ४.७

गटशिक्षणाधिकारी व प्रशासन अधिकारी यांच्या मुलाखत सूचीचे वर्गीकरण

| विभाग | प्रश्न क्रमांक | संबंधित क्षेत्र |
|---|---|---|
| १ | १ ते ६ | शिक्षण समितीबाबत माहिती. |
| २ | ७ ते १६ | शाळा पर्यवेक्षण व तपासणीबाबत माहिती. |
| ३ | १७ ते २१ | शिक्षकांच्या वेतनाबाबतची माहिती. |
| ४ | २२ ते २६ | शिक्षक नेमणूकाबाबतची माहिती. |
| ५ | २७ ते २९ | प्रशासनाबाबतची माहिती. |

ही मुलाखत सूची परिशिष्ट क्रमांक १० मध्ये दिली आहे. मुलाखत घेतलेल्या गटशिक्षणाधिकारी व प्रशासन अधिकारी यांच्या नावांची यादी परिशिष्ट क्रमांक ११ मध्ये दिली आहे.

## ३. भेटी व निरीक्षण -

संशोधकाने माढा तालुक्यातील, संशोधनासाठी नमुना म्हणून निवडलेल्या २५ प्राथमिक शाळांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. भेटी दिलेल्या प्राथमिक शाळांच्या नावांची यादी परिशिष्ट क्रमांक १ मध्ये दिलेली आहे. भेटी दिलेल्या शाळांची वर्गवारी सारणी क्रमांक ४.८ मध्ये पुढील प्रमाणे आहे.

**सारणी क्रमांक ४.८**
**भेटी दिलेल्या प्राथमिक शाळांचे वर्गीकरण**

| अ.क्र. | वर्गीकरण | एकूण शाळा |
|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद शाळा | १० |
| २ | नगरपालिका शाळा | १० |
| ३ | खाजगी विना अनुदानित शाळा | ०५ |

## ४.५ संशोधनाची कार्यपध्दती :-

संशोधनाच्या अभ्यासासाठी संशोधकाने

खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

१) प्रथम संशोधकाने प्राथमिक शाळा संबंधित संदर्भ साहित्य व शासकीय परिपत्रकाचा अभ्यास केला.

२) संदर्भ साहित्याचा अभ्यास केल्यानंतर प्रस्तुत संशोधनाचा आराखडा संशोधकाने तयार केला.

३) माढा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा, नगरपालिका प्राथामिक शाळा आणि खाजगी विना अनुदानित प्राथमिक शाळांची संशोधन अभ्यासासाठी संशोधकाने निवड केली.

४) सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केल्याने मुख्याध्यापक, शिक्षक व पालक यांच्यासाठी प्रश्नावली तयार करुन त्या त्यांच्याकडून भरुन घेण्यात आल्या.

५) मुख्याध्यापक, गटशिक्षणाधिकारी व प्रशासन अधिकारी यांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

६) संशोधकाने २५ प्राथमिक शाळांना प्रत्यक्ष भेटी दिल्या व निरीक्षण करुन माहिती संग्रहित केली.

### ४.६ समारोप -

संशोधकाने या प्रकरणामध्ये आपल्या प्रस्तुत संशोधनासाठी माहिती कशी संकलित केली याचे विवेचन केले आहे. पुढील प्रकरणात हया संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन केले आहे.

### संदर्भ -


१) मुळे, रा. शं. व उमाठे, वि. तु. (१९७७): " शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे" नागपूर, साहित्य प्रसार केंद्र प्रकाशन, पृष्ठे : ११०-१२७, १८१-१८७, १९१-२१७.

२) बापट, भा.गो. (१९७५) : "शैक्षणिक संशोधन ", पुणे, नूतन प्रकाशन, पृ. १३३.

३) भिंताडे, वि. रा० (१९९३) :"शैक्षणिक संशोधन पध्दती " पुणे, नूतन प्रकाशन, पृ. ६५ ते ७१.

४) संत, दु.का. (१९८६) :"संशोधन पध्दती प्रक्रिया अंतरंग" पुणे, विद्यार्थी गृह प्रकाशन, पृ ३२,३३.